

संस्कृत सघन उच्चार पद्धती

वैभव जगताप

दादाकृष्ण घोटाले

२-९-२०१६ सोमवार

(1)

संस्कृत — सघन — उच्चार — पद्धति

आपलें मनीं वसत असलेला विचार, भाव - इतरांस समजावून सांगण्याचे सांकेतिक 'ध्वनि' म्हणजे 'भाषा'. भाषा म्हणजे ध्वनिरूपशब्द व वर्णरूपशब्द यांचा असीम विस्तार होय. भाषेच्या विशुद्ध उच्चाराची एक **'घनता'** आहे. शुद्धउच्चाराची घनता, **'यथार्थ - अर्थवाहक पदांची घनता'**, उच्चार कर्त्याच्या सद्भावनेची, तपश्चर्येची घनता, उच्चारण कर्त्याच्या 'प्रातिभ - अनुभूतिगुण संपन्नतेची घनता', अशी 'शब्दघनता' अनेक प्रकारची आहे.

संस्कृत वेद - शास्त्रादि अनेक ग्रंथांमध्यें 'ज्ञाना'ची फार मोठी सांठवण आहे. संस्कृतभाषा येत असेल त्यासच तें ज्ञान संपादन करणें शक्य व सुलभ आहे. लेखनांत **'घसेट लेखन'** अंशत: मान्य आहे; पण 'घसेट उच्चारण' मान्य नाहीं. यद्यपि **'घसेट - उच्चारण'** हि आपले विचार - भावना इतरांस समजावून सांगण्याचे एक 'माध्यम', प्रभावी साधन आहे. 'देवनागरी लिपी' ही सर्व लिपींची मूळ - जनयित्रि आहे. 'संस्कृत' भाषाहि एकानेक भाषांची मूळ असल्याचा आढळ होतो.

तसेंच ईश्वरकृपा - श्रीगुरूकृपा प्राप्त होण्यासाठीं आपल्या हातून कांहीं तरी ईश्वर - सेवेचे, देवाराधनेचे कार्य व्हावयास हवे. ईश्वरसेवेचे - आराधनेचेहि अनेक प्रकार आहेत. त्यांतच ईश्वराची स्तुति - स्तोत्रें भक्तिभावनेनें म्हणत राहणे, प्रासादिक ग्रंथांची पारायणें करणें, नामगीत गाणे याहि प्रकारांचा समावेश आहे. विशुद्ध पठण, विशुद्ध स्तोत्रगान, शुद्ध - पारायण हा त्याचा 'पाथेय' आहे, पायथा आहे, ही अगदीं पहिली - वहिली पायरी आहे. त्यानंतर अर्थ परिचय, समन्वयाने अर्थपरिचय, आणि ईश्वराच्या साक्षात्कारात्मकज्ञानानें अर्थरूपता संपादन करणें या पायऱ्या आहेत, हे खास.

'संस्कृत' स्तुति - स्तोत्रें विशुद्धरूपानें म्हणता येण्यासाठीं, संस्कृतांतील विशुद्ध - उच्चारपद्धतीची अचूक जाण आपणास असणें अत्यंत आवश्यक आहे. हे 'उच्चार' त्याच्या जाणकारांपासून समजून घ्यावेत. तसेंच संस्कृतचे पंडित, संस्कृत जाणणारे, प्रवचन - कीर्तनांमध्यें कसे उच्चार करतात, त्याकडे नीट लक्ष द्यावे. आपणहि ते तसे उच्चारकरून, त्यांकडून 'संथा' घेऊन आपले उच्चार अचूक, बरोबर असल्याचे त्यांचेद्वारां खात्री करून घ्यावी.

तसेंच 'यज्' धातूचे संगतिकरण, दान आणि पूजा, असें तीन अर्थ आहेत. त्यांपैकीं 'संगतिकरण' या अर्थाचेहि पुन: प्रधान असे तीन अर्थ आहेत. त्यांत पहिला अर्थ असा —

१. वेदाची संथा अथवा संस्कृत स्मृतिग्रंथाची संथा घेत असतांना श्रीगुरुंच्या मुखांतून ज्या क्रमानें स्वरादि विशिष्टरूपाने निघालेल्या शब्दांशीं शिष्यानें सुसंवादीपणानें अस्सलबरहुकूम ऐक्य करणे, तसाच **'उच्चार करणें'** यासच 'संगतिकरणरूप' 'वाग्यज्ञ' म्हणतात.

२. वेद - शास्त्राचा पाठ अथवा अध्यात्मविद्येचा पाठ उपदेशरूपानें देत असतांना श्रीगुरुंच्या मुखांतून निघालेल्या शब्दांशीं, त्यांना अभिप्रेत असलेल्या अभिप्रायाशीं, तात्पर्याशीं - शिष्यानें आपल्या शब्दानें, अभिप्रायाचे, आशयाचे **'अनुवादपणानें'**, संगतिकरण - म्हणजे - पुरते ऐक्य करणे, यालाहि **'वाग्यज्ञ'** म्हणतात.

३. श्रीगुरुकृपेनें लाभलेले समाधिधन, ब्रह्मात्मैक्य बोधधन शिष्याच्या हृदयरूप संदुकेंत संक्रमित करून दिले असतां त्या सद्बोधानंदाच्या तुल्य स्वरूप अशा संगतिकरणानें, ऐक्यानें, ब्रह्मत्वाने असणें, हाच 'वाग्यज्ञ' होय. हा सर्वहि अभिप्राय मनीं घेऊन श्रीज्ञानदेव महाराज चवथ्या अध्यायांत सांगतात —

एकीं शब्दीं शब्दु यजिजे। तो वाग्यज्ञ म्हणिजे॥४ - १४२॥

असा 'वाग्यज्ञ' संपन्न होण्यासाठीं उच्चारपद्धतीची शुद्धता वा घनता प्राथमिक स्वरूपांत ज्ञात असणे जरूरीचे आहे, हे जाणून केवळ मार्गदर्शनाकरितां शुद्ध उच्चाराचे कांहीं नियम आम्ही येथें दिले आहेत. ते समजून घेऊन त्याप्रमाणे आणि जाणकारांच्या द्वारां संथा घेऊन त्याप्रमाणें तसा उच्चार करण्याचा प्रयत्न करावा.

तसे पाहिलें तर मराठींत संस्कृत, तत्सम आणि संस्कृतोद्भव शब्दांचा विपुल प्रमाणांत उपयोग केला जातो. म्हणून संस्कृत उच्चार शुद्ध स्वरूपांत करणे आपल्याला फारसे 'अवघड' नाहीं. प्रस्तुत लेखांत संस्कृत शब्दांची रूपें, वाक्यें आपण निर्माण करण्याविषयीं काहीं लिहिणार नाहीं. तर संस्कृतांत लिहिलेली वाक्यें, स्तोत्रें फक्त शुद्ध वाचावयाची - उच्चार करावयाची आहेत. प्रत्येक मराठी साक्षरास तेवढे लिपि ज्ञान असतेच. तरीहि उच्चारास आवश्यक तेवढा 'वर्णमाले'चा व शुद्ध, सुस्पष्टउच्चार करण्यास अर्थात् शब्दांतील वर्ण, ऱ्हस्व, दीर्घस्वर, बरोबर, तसेंच जोडाक्षरें वा सामासिकपदें यांचा स्पष्टपणानें समजतील अशा प्रकारानें - पद्धतीने शब्दांचे उच्चार करण्यास उपयुक्त असणाऱ्या नियमांचा विचार करणे, हे एवढेच मर्यादित आपले 'ध्येय' आहे.

देवनागरीलिपी, वर्णमाला' आणि तिची वैशिष्ट्यें —

वर्णमाला — स्वर १३

'स्वयं राजते इति स्वर:' स्वत: अंगानेच शोभतो, विराजमान होतो तो 'स्वर' होय. जसें 'व्यंजनास' विराजमान होण्यासाठीं 'स्वराची' आवश्यकता

असते, तशी स्वरास नसते, असा यांतील आशय आहे.

ऱ्हस्व	दीर्घ
अ	आ
इ	ई
उ	ऊ
ऋ	ॠ
ऌ	

संयुक्तस्वर— ए, ऐ, ओ, औ

याशिवाय कोणत्या वर्णाचे, कोणते स्थान आहे, हे जाणण्यासाठीं व पाठांतरासाठीं सुलभ उपाय म्हणून पुढील वाक्यांचे संकलन देत आहोत—

व्यंजने – ३३

वर्ग	कठोर–अघोष	मृदु–घोष	अनुनासिक
'क' वर्ग - कण्ठ्य —	क् ख्	ग् घ्	ङ्
'च' वर्ग - तालव्य —	च् छ्	ज् झ्	ञ्
'ट' वर्ग - मूर्धन्य —	ट् ठ्	ड् ढ्	ण्
'त' वर्ग - दन्त्य —	त् थ्	द् ध्	न्
'प' वर्ग - ओष्ठ्य —	प् फ्	ब् भ्	म्
अन्तस्थ		य् र् ल् व्	
ऊष्म		श् ष् स्	
महाप्राण		ह	

संयुक्त व्यंजनें— क्ष, ज्ञ, ळ

— अनुस्वार; : विसर्ग

१. **अकुह विसर्जनीयानां कण्ठः**— 'अ'कार, 'क'वर्ग 'ह'कार आणि विसर्ग, या अक्षरांचे स्थान कंठ आहे. अर्थात् 'अ, क, ख, ग, घ, ङ, विसर्ग'

२. **इचुयशानां तालु** – इ, 'च' वर्ग, 'य' आणि 'श' यांचे स्थान तालु आहे.

३. **ऋटुरषाणां मूर्धा** – ऋ, 'ट' वर्ग 'र', 'ष' यांचे स्थान मूर्धा आहे.

४. **ऌतुलसानां दन्ता** – ऌ, 'त' वर्ग ल, स यांचे स्थान दन्त आहे.

५. **उपूपध्मानीयानामोष्ठौ** – उ, 'प' वर्ग, उपध्मानीय यांचे स्थान ओठ आहे. (विसर्गापुढे 'प', 'फ' ही व्यंजनें आली असतांना विसर्गाचा उच्चार 'अ:प' असा होतो यास 'उपध्मानीय' असे म्हणतात.)

६. **ञमङणनानां नासिकाच** – ञ, म, ङ, ण, न, या वर्णांचे नासिका आणि त्या त्या वर्णाचे स्थान. उदा. 'ञ' चे स्थान तालु व नासिका आहे.

७. **एदैतोः कण्ठतालु**:– 'ए'कार आणि 'औ'कार यांचे कण्ठ तालुस्थान आहे.

८. **ओदौतोः कण्ठोष्ठम्**:– 'ओ'कार आणि 'औ'कार यांचे स्थान कंठोष्ठ आहे.

९. **'व' कारस्य दंतोष्ठम्**:– 'व' वर्णाचे स्थान 'दंत्य' आणि ओठ आहे.

१०. **जिव्हामूलीयस्य जिव्हामूलम्**:– जिव्हामूलीयाचे जिव्हामूल स्थान आहे. विसर्गाच्या पुढे 'क, ख' आले असतांना जो उच्चार होतो त्याला 'जिव्हामूलीय' म्हणतात.

११. **नासिकानुस्वारस्यः**– नासिका हे अनुस्वाराचे स्थान आहे.

स्वरांमध्यें 'अ, इ, उ, ऋ, ऌ' हे पांच 'ऱ्हस्व' स्वर आहेत. ऱ्हस्व स्वराची 'एक मात्रा' असते आणि दीर्घस्वराच्या 'दोन मात्रा' असतात. हेच वेगळ्या शब्दांत सांगावयाचे झाले तर ते असे —

अ + अ = आ

इ + इ = ई

उ + उ = ऊ

ऋ + ऋ = ॠ

'आ, ई, ऊ, ॠ' हे चार दीर्घ-स्वर आहेत. 'ऌ' स्वर हा फक्त ऱ्हस्व आहे, दीर्घ नाहीं. हे आवर्जून लक्षीं ठेवावे.

आतां '**अकः सवर्णे दीर्घः**' यासूत्रानुसार 'सवर्ण' म्हणजे एकाच जातीचे, सजातीय दोन 'स्वर' एका जवळ एक, एका पुढे एक आले असतां ते एकमेकांत मिळून 'दीर्घस्वर' होतो. याला 'सवर्ण दीर्घ संधि' म्हणतात. तसेच वेगवेगळ्या जातीचे – विजातीय 'स्वर' जवळ-जवळ आले असतां '**संयुक्त स्वर**' होतात, जसे —

'अ' किंवा 'आ' + 'इ' किंवा 'ई' = ए

'अ' किंवा 'आ' + 'उ' किंवा 'ऊ' = ओ

'अ' किंवा 'आ' + 'ए' किंवा 'ऐ' = ऐ

'अ' किंवा 'आ' + 'ओ' किंवा 'औ' = औ.

संयुक्त स्वरांत एकापेक्षां अधिक स्वर आहेत, म्हणून ते 'दीर्घ' असतात, हे उच्चार करते वेळीं नीट ध्यानांत ठेवावे. तसेंच व्यंजनामध्यें संस्कृतांतील

वर्णमालेमध्ये 'ळ' हे स्वतंत्र व्यंजन नाही, हेहि ध्यानात ठेवावे. पण ळ हे संस्कृत वाङ्मयांत 'संध्यक्षर' म्हणून येते. ऋग्वेदाच्या प्रारंभींच 'अग्निमीळे पुरोहितम्' या वचनांत 'ळ' हे अक्षर आले आहे. याविषयीं असा नियम आहे कीं, 'अज्मध्यस्थस्यडकारस्य 'ळ'कार:' बह्वृचना जगु:।' दोन स्वरांमध्यें 'ड' हे व्यंजन आले असतां त्याचा 'ळ' होत असतो. 'ईळे' या रूपांत 'ई + ड् + ए' अशी स्थिती असल्यामुळें 'ड'चा 'ळ' झाला आहे. म्हणून हे एक 'संध्यक्षर' आहे.

तसेंच– 'क + ष् = क्ष्' अर्थात् 'कष योगे क्ष:' आणि 'ज् + ञ् = ज्ञ्' अर्थात् 'जञोर्ज्ञ:' म्हणजे क् + ष् = यांच्यापासून 'क्ष्' हे संयुक्त व्यंजन होते, तर ज + ञ् यांच्या संबंधामुळें 'ज्ञ्' हे संयुक्त व्यंजन होते, ही स्वतंत्र 'वर्ण' नव्हेत तीं 'संध्यक्षर', संयुक्त व्यंजनें आहेत.

वर्णमालेंत व्यंजनें कशी लिहिली आहेत ते बारकाव्यानें लक्षांत ठेवावे अर्थात् केवळ 'व्यंजन' हे 'क्, ख्' असे पायमोडून लिहितात. आपण 'क' असे अक्षर लिहितो ते 'क्' व्यंजन + 'अ' स्वर मिळून = 'क' अक्षर झालेले असते. यास 'पूर्णाक्षर सन्धि' असेहि म्हणतात. ह्याच प्रमाणें–

व्यंजन + स्वर = अक्षर या सूत्रानुसार –

क् + आ = का;	क + इ = कि;	क् + ई = की;
क् + उ = कु;	क् + ऊ = कू;	क् + ऋ = कृ;
क + ॠ = कॄ;	क् + ऌ = क्ऌ;	क् + ए = के;
क् + ऐ = कै	क् + ओ = को;	क् + औ = कौ
क् + अ + —	= कम् क् + अ	+ : = क:

अशी बाराक्षरी-बाराखडी बनते. एकट्या 'व्यंजनाचा' पूर्ण उच्चार करता येत नाहीं; त्यासाठीं व्यंजनात 'स्वर' मिळतो तेव्हां त्याचा पूर्ण उच्चार होतो स्वरयुक्त व्यंजन म्हणजे 'अक्षर'. नुसत्या एकुलत्या एका कोणत्याहि स्वराचा पूर्ण उच्चार होतो. म्हणून 'स्वर' हे स्वयंपूर्ण अक्षर आहे; पण 'व्यंजन' हे केवळ, स्वयंपूर्ण अक्षर नसते; हेच खरे.

'रूपें' शिकवतेवेळीं 'राम' हा 'अ' कारान्त शब्द आहे आणि 'हरि' हा मात्र 'इ'कारान्त शब्द आहे, असे म्हणतात. म्हणजे 'राम' शब्दाच्या अंतीं 'अ' आहे व 'हरि' शब्दाच्या अंतीं 'इ' आहे. त्याचा अर्थ आपल्याला कळावा म्हणून पुढील प्रमाणें लिहितो–

"राम = म्हणजे = र् + आ; म् + अ" यांत शेवटीं, अंतीं 'अ' स्वर आहे म्हणून 'राम' हा 'अ' कारान्त शब्द आहे तर–

"हरि = ह् + अ; र् + इ' यांत अंतीं, शेवटीं 'इ' स्वर आहे. म्हणून 'हरि' हा 'इ' कारान्त शब्द आहे.

[illegible] शब्द होत आणि ज्या शब्दाच्या अंतीं, शेवटीं 'व्यंजन' येते, ते 'व्यंजनात' शब्द होत. उदाहरणार्थ मरुत्, राजन्, मनस् इत्यादि.

व्यंजना नंतर आलेला 'स्वर' त्यांत मिळून ते 'अक्षर' होते. त्याचप्रमाणें दोन अथवा अधिक व्यंजनें आणि त्या नंतरचा 'स्वर' मिळून 'जोडाक्षर' तयार होते. जोडाक्षरांत किती व्यंजनें असावीत याविषयीं नियत असा नियम नाहीं. उदाहरणार्थ 'कार्त्स्न्यं' यांतील 'र्त्स्न्यं'मध्ये 'र् + त् + स् + न् + य् + अ' अशी एकूण पांच व्यंजनें आहेत.

— अनुस्वार आणि : विसर्ग ही चिन्हे आपल्याला ठाउकी आहेतच. अनुस्वारा सारखे ँ हे एक चिन्ह आहे. त्याला 'अनुनासिक' म्हणतात. त्याचा उच्चार मात्र 'अधिक भार' देऊन केलेल्या अनुस्वारासारखाच होतो. उदाहरणार्थ —

अस्माँस्तारयिष्यति। श्रद्धावाँल्लभते ज्ञानम्। हत्वापि स इमाँल्लोकान्। इत्यादि. 'ऽ' या चिन्हाला 'अवग्रह' म्हणतात. ("एङ: पदान्तादति" ॥६-१-१०९ या सूत्रानुसार.) शब्दाच्या शेवटीं असलेल्या 'ए' किंवा 'ओ' नंतर यांच्यापुढे 'अ' आला तर त्या 'अ' चा लोप होतो आणि त्याच्या जागीं 'अवग्रह' चिन्ह येते. उदा:– इमे-अवस्थिता: = इमेऽवस्थिता:; लोके-अस्मिन् = लोकेऽस्मिन्; प्रथमो + अध्याय: = प्रथमोऽध्याय: संस्कृतमार्षेत भिन्न भिन्न शब्दांतील असले तरी जवळ जवळ आलेल्या व्यंजनांचा, 'व्यंजन' आणि 'स्वर' यांचा, आणि स्वरांचा 'सन्धि' हा अवश्य होतोच. उदाहरणार्थ तत्-तत् = तत्तत्; वक्तुम्-अर्हसि = वक्तुमर्हसि, न-अस्ति = नास्ति; याला कांहीं 'अपवाद' आहेत; ते असे. तसेंच संस्कृतांत '।' असा एक अथवा '॥' असे दोन दंड हीं दोनच प्रधान विराम चिन्हें आहेत; पण स्वल्पविराम, अर्धविराम, प्रश्नचिन्ह वगैरेंचाहि उपयोग करण्याची पद्धति बहुत थोड्या प्रमाणांत वा थोड्या बहुत प्रमाणात पडली आहे, हे सत्यहि नाकारता येत नाहीं. अर्थात् लैखिक पद्धतींत ती विराम चिन्हे आहेत ती अविरुद्ध आहेत.

१. ऱ्हस्वस्वराची एकमात्रा आणि दीर्घस्वराच्या दोन मात्रा असतात, हे आपणास पूर्वीं सांगितलें आहेच. म्हणून 'ऱ्हस्व-स्वर' उच्चारण्यास जेवढा वेळ लागतो, त्यापेक्षां 'दीर्घ स्वर' उच्चारण्यास 'अधिक' वेळ लागतो आणि त्यामुळेंच 'ऱ्हस्व स्वर' आणि 'दीर्घ-स्वर' यांतील फरक स्पष्ट होईल असेच उच्चारण करावयास हवे. नाहींतर अर्थ भेदहि होतो. जसे 'दिन' म्हणजे 'दिवस'. यांतील 'दि' हे अक्षर उच्चारण करण्यास जेवढा वेळ लागतो; त्यापेक्षां 'दीन' म्हणजे 'गरीब' यांतील 'दी' दीर्घ असून त्याचे उच्चारण करण्यास 'अधिक' वेळ लागतो, असेंच सर्वत्र 'ऱ्हस्व' आणि

'दीर्घ' यांतील फरक केवळ उच्चारावरून स्पष्ट होईल, असाच उच्चार झाला पाहिजे. तसेंच 'ऱ्हस्व' किंवा 'दीर्घ' 'अ, इ, उ, ऋ' च्यापुढे सवर्ण म्हणजे तोच स्वर आला तर त्या दोन्हींचा मिळून 'दीर्घ स्वर' होतो. उदाहरणार्थ – १ तस्य - अहम् = तस्याहम्; २ यथा - आकाशस्थित: = यथाकाशस्थित:; ३ इंद्रियाणि - इन्द्रियार्थेम्य: इन्द्रियाणीन्द्रियार्थेम्य:; ४ अङ्गानि - इव = अङ्गानीव, तेषु - उपजायते: तेषूपजायते; ६ तु - उद्देशत: = तूद्देशत:, ७ गीतासु - उपनिषत्सु = गीतासूपनिषत्सु; न - अनुवर्तयति - इह = नानुवर्तयतीह 'अक: सवर्णे दीर्घ:' ६ - १ - १०१.

२. 'ऋ' या स्वराचा उच्चार 'रि' आणि 'रु' या दोन अक्षरांच्या मधल्या उच्चारासारखा करावा; 'लृ' चा उच्चारहि 'लि' आणि 'लु' यांच्या मधल्या उच्चारासारखा करावा. तो प्रत्यक्ष श्रीगुरूमुखानेंच समजून प्रत्यक्ष - तेत आणावा.

३. वर्णमालेंतील 'च' वर्गाची व्यंजनें मराठीमार्षेत दोन तऱ्हेनें उच्चारली जातात; एक म्हणजे 'चक्र, छाया, जन्म, झंकार' या शब्दांतील उच्चाराप्रमाणें, आणि दुसरा म्हणजे 'चमचा, जहाज, झगडा' या शब्दांतील उच्चाराप्रमाणें, उच्चारली जातात; पण संस्कृतभाषेमध्यें उपर्युक्त - वरील उच्चारांपैकी दुसऱ्या प्रकारचा उच्चार नाहीं, तर सर्वत्र पहिल्या प्रकारचा म्हणजे 'चक्र, छाया, जन्म, झंकार' यांतील उच्चारासारखाच उच्चार करावा.

४. अनुस्वारानंतर म्हणजे 'ज्या अक्षरावर अनुस्वार आहे, त्या अक्षरानंतर' ज्या 'वर्गा'चे वा वर्गांतील व्यंजन असेल त्या वर्गांतील 'अनुनासिका'सारखा त्या 'अनुस्वारा'चा उच्चार करावा. अनुस्वारापुढील अक्षर ज्या वर्गांतील असेल त्या वर्गाचे अनुनासिक होत असते असा 'अनुस्वारस्य ययि परसवर्ण:' ८ - ४ - ५८ या सूत्रानुसार सन्धि होतो. इतकेच नव्हे तर लिहितांना सुद्धां त्या अनुस्वाराऐवजी त्याच्या पुढील व्यंजनाच्या वर्गाचे अनुनासिक लिहावे. उदाहरणार्थ - १ अङ्ग, २ व्यञ्जन, ३ कण्ठ्य, ३ दन्त्य, ५ अम्बा.

५. 'पंचमी' शब्दाचा उच्चार कांहीं लोक 'पन्चमी' असा करतात; तो चुकीचा आहे. त्याचा 'पञ्चमी' असाच उच्चार करावा.

६. आतां अनुस्वारानंतर 'क, च, ट, त, प' या वर्गाखेरीज ''य, र, ल, व, श, ष, स, ह' यांपैकीं कोणतेहि व्यंजन आले तर अनुस्वार कायम तसाच राहतो; पण त्यांचा उच्चार मात्र पुढे आलेल्या व्यंजनानुगुण म्हणजे पुढील व्यंजनास जुळणारा सानुनासिक करतात. त्याची उदाहरणें म्हणजे –

'संयम, संरक्षण, संलग्न, संशय, संसार, संहार' ही प्रसिद्ध स्वरूपें होत.

७. संस्कृतमध्यें जोडाक्षरापूर्वी आलेल्या अक्षरांवर जोडाक्षरानुगुण म्हणजे पुढील व्यंजनास जुळणारा असा 'भार' किंवा 'आघात' येतो, तो जाणीवपूर्वक करावा. उदाहरणार्थ 'धर्मक्षेत्रे' यांत 'र्म, क्षे आणि त्रे' हीं जोडाक्षरें आहेत. म्हणून ध, र्म, आणि 'क्षे', या अक्षरांवर भार - आघात येतो.

मराठी भार्षेत 'पुण्याला, जाड्या, रड्या, उद्या' अशाप्रकारच्या जोडाक्षरांच्या पूर्वीच्या अक्षरावर 'भार - आघात' नसतो; पण संस्कृतमध्यें असे नाहीं; जो जोडाक्षराच्या पूर्वीच्या अक्षरावर 'भार - आघात' हा निरपवाद येतोच; हा अनुपरोध नियम आहे.

८. विसर्गाचा उच्चार मात्र 'नीऽऽट' समजाऊन घ्यावा, तोहि चांगल्या जाणकारांकडून समजाऊन घ्यावा. श्वासाचे जोरानें शरीराच्या बाहेर मुखावाटे विसर्जन केल्यानें होणारा 'उच्चार' म्हणजेच 'विसर्ग' होय. म्हणून विसर्गाचा उच्चार, हा विसर्गाच्या पूर्वी असणाऱ्या स्वराशीं मिळत्या जुळत्या 'ह' सारखा करावा; अर्थात् –

१. 'देव:' चा उच्चार 'देवहा' सारखा करावा.
२. 'देवा:' चा उच्चार 'देवाहा' सारखा करावा.
३. 'हरि:' चा उच्चार 'हरिहि' सारखा करावा.
४. 'गुरु:' चा उच्चार 'गुरुहु' सारखा करावा.
५. 'देवै:' चा उच्चार 'देवैहि' सारखा करावा.
६. 'देवयो:'चा उच्चार 'देवयोहो' सारखा करावा.

वर सांगितल्या प्रमाणें (:) विसर्गाचे उच्चार करावेत, तेच विशुद्ध होत.

९. आतां विसर्गानंतर 'क, ख, किंवा प, फ' हीं व्यंजनें आली तर मात्र या विसर्गाचा उच्चार मागील स्वराशीं मिळता - जुळता न करतां पुढील व्यंजनास मिळता - जुळता व कांहींसा अधिक 'भारपूर्वक - आघातपूर्वक' करावा, तो मार्गदर्शकाकडून संथा घेऊनच नीट समजाऊन घ्यावा; उदाहरणार्थ --

'क: खनति, क: पश्यति, अधियज्ञ:कथं कोऽत्र। य: पश्यति। शब्द:खे

१०. ('वा शरि' ८ - ३ - ३६ या सूत्रानुसार) तसेच विसर्गानंतर 'श, ष, किंवा स' आल्यास विसर्गाचा उच्चार मात्र अनुक्रमें 'श, ष किंवा स' असा करावा वा लिहावा उदाहरणार्थ – 'हरि:शेते' अथवा 'हरिश्शेते' असे लिहितात, षा उच्चार करतात. 'देव: षडानन:' अथवा 'देवष्षडानन:' 'य: सदा' अथवा 'यस्सदा'

यारीतीनें कोणत्याहि रीतीनें लिहिले तरी उच्चार मात्र सारखाच

होतो, त्यांत मुळीहि फरक होत नाहीं. म्हणून तसा उच्चार करावा.

११. 'श्, ष्, स्' यांत सूक्ष्म फरक आहे, म्हणून दक्षतापूर्वक नीट आणि स्पष्ट उच्चार करावेत, हा फरक फारांच्या लक्षीं येत नसल्याचा आढळ होतो. म्हणून साधकानें हा नियम कटाक्षानें पाळावा. अर्थात् आपण 'शशमृग' या शब्दाच्या उच्चारामध्यें ज्याप्रमाणें 'जीभे'ने टाळूला किंचित् स्पर्श करून 'श्' चा उच्चार सहजतेनें करतो, तसाच सर्वत्र उच्चार करावा. 'षट्कोण' या शब्दाच्या उच्चाराचे वेळी जीभेनें टाळूच्या वरच्या भागाला म्हणजे मूर्धाला स्पर्श करतो, त्याप्रमाणेंच सर्वत्र 'ष्' चा उच्चार करावा 'समई' या शब्दाचे उच्चाराचे वेळीं जसा दातांना किंचित् जिभेचा स्पर्श करून उच्चार करतो, तसाच सर्वत्र 'स्' चा उच्चार करावा.

१२. जोडाक्षरांमध्यें ज्या क्रमानें व्यंजनें मूळांत जोडली गेलेली असतात, त्याच क्रमानें बहुत करून, प्राय: लिहितांत. आपण उच्चार करतांनाहि प्राय: अगदीं त्याच क्रमानें उच्चार करावेत. उदाहरणार्थ–

वस्तु - यांत 'स्'चा उच्चार पहिल्यान्दां आहे; नंतर 'तु'चा आहे.

वत्स - यांत 'त्'चा उच्चार पहिल्यान्दां आहे; नंतर 'ल'चा उच्चार आहे.

शुक्ल - यात 'क्'चा उच्चार पहिल्यान्दां आहे; नंतर 'क'चा उच्चार आहे.

शुल्क - यांत 'ल्' चा उच्चार प्रथम आहे; नंतर 'क' चा उच्चार आहे.

१३. कांहीं जोडाक्षरांमध्यें 'वर्णचिन्ह' 'वर्णचिह्न' खाली किंवा वर जोडतात. उदाहरणार्थ - महाराष्ट्र, प्रकाश, कार्य इत्यादि.

१४. 'ब्राह्मण' 'ब्रह्म' मधील 'ह्म' ह्या सारख्या जोडाक्षरांत 'ह्' हा प्रथम असतो व संस्कृतांत लिहिताना अशा जोडाक्षरांतील 'ह्' पहिल्यान्दां लिहितात उदाहरणार्थ 'ब्राह्मण, चिह्न, जिह्वा,' या जोडाक्षरांचे उच्चार 'ब्राह्मण, चिह्न, जिह्वा' असे 'ह्'चा पहिल्यांदा उच्चार करून करावेत.

१५. तसेंच 'तर्हि, कर्हि, अर्हता' या किंवा यासम शब्दांमध्यें 'र्' प्रथम आहे आणि 'ह्' नंतर आहे; म्हणून त्याचा उच्चार त्याच क्रमानें व तसाच म्हणजे 'तर्हि' असाच करावा.

श्रीमद्भगवत् गीतेंतील कांहीं 'सन्धी'च्या उदाहरणांवरून कांहीं संधि नियम समजाऊन घेऊं–

१. 'आद्गुण:' ६-१-८७ या सूत्रानुसार 'अ' किंवा 'आ' च्या पुढे 'ह्रस्व' किंवा 'दीर्घ' 'इ, उ, ऋ, लृ' आले, तर दोन्हींच्या स्थानीं क्रमानें 'ए, ओ, अर्, अल् येतात १. न इङ्गते = नेङ्गते;. २. दृष्ट्वा - इदम् = दृष्ट्वेदम्; यथा - उल्बेन = यथोल्बेन; ४ आतिष्ठ - उत्तिष्ठ = आतिष्ठोत्तिष्ठ; ५ सा - उपमा = सोपमा.

२. 'वृद्धिरेचि' ६-१-८८ या सूत्रानुसार 'अ' किंवा 'आ' च्या पुढे 'ए' किंवा ऐ आला तर ह्यादोहींचा मिळून 'ऐ' होतो. 'ओ' किंवा 'औ' आला तर 'औ' होतो. उदा. १ आत्मा एव = आत्मैव २. च औषधी = चौषधी:

३. 'इकोयणचि' ६-१-७७ या सूत्रानुसार 'ऱ्हव' किंवा 'दीर्घ' 'इ, उ, ऋ, लृ' यांच्यापुढे त्यांच्या खेरीजचा असा इतर दुसरा कोणताहि 'स्वर' आला तर त्यांच्या स्थानीं अनुक्रमें 'य्, व्, र्, ल्' येतात. उदाहरणार्थ १ भजामि अहम् = भजाम्यहम्; २ तानि अहम् = तान्यहम्; ३ दु:खेषु - अनुद्विग्न - मना: = दु:खेष्वनुद्विग्नमना: ४. अस्तु इष्टकामधुक् = आस्त्विष्टकामधुक्.

४. 'एचोऽयवायाव:' ६-१-७८ या सूत्रानुसार य् व् चा लोक सांगणारे सूत्र "लोप = शाकल्यस्य' ८-३-१९ लोप झाल्यावर राहिलेल्या स्वरांचा संधि होत नाही. कारण 'पूर्वत्रासिद्धी" ८-२-१ लोक झाला तरी तो प्रसिद्ध आहे. म्हणजे तेथे य्, व्, आहेत असेच समजावयाचे असते म्हणून संधि होत नसते. ए, ऐ, ओ, औ, यांच्यापुढे कोणताहि 'स्वर' आला तर त्यांच्या स्थानीं अनुक्रमें 'अय्, आय्, अव्, आव्' येतात. या 'अय्, आय्, अव्, आव' यांच्या मधील 'य्' अथवा 'व्' चा विकल्पानें लोप होतो. लोप झाल्यावर मग उर्वरित राहिलेल्या स्वरांचा मात्र सन्धि होत नाहीं. उदाहरणार्थ:– १. रथोपस्थे - उपाविशत् = रथोपस्थ, युपाविशत् किंवा रथोपस्थ उपाविशत्; २. वर्तन्ते + इति = वर्तन्तयिति किंवा वर्तन्त इति; ३. ब्रह्माग्नौ + अपरे - ब्रह्माग्नावपरे किंवा ब्रह्माग्न अपरे, ४. समाधौ + अचला = समाधावचला किंवा समाधा अचला; ५. योत्स्ये + इति = योस्ययिति. किंवा योत्स्य इति; ६. ते इमे - तयिमे किंवा त इमे; ७. मोदिष्ये इति - मोदिष्य इति इत्यादि.

५. 'ङ मो ऱ्हस्वादचिङमुण नित्यम्' ८-३-३२ यासूत्रानुसार पदान्तीं 'ङ्, ण्, न्' ही येऊन यांच्यामागे 'ऱ्हस्व - स्वर' असून पुढे 'स्वर' आला तर 'ङ्, ण्, न्' यांचे द्वित्व होते. उदाहरणार्थ:– प्रहसन् - इव = प्रहसन्निव; अनिच्छन् - अपि = अनिच्छन्नपि.

६. 'खरिच' ८-४-५५ झलांजश झशि. ८-४-५३ या सूत्रानुसार अन्त:स्थ वर्ण सोडून कोणत्याहि व्यंजनापुढे 'कठोर व्यंजन' आले तर मागील व्यंजना बद्दल त्याच्याच वर्गातील पहिले व्यंजन येते. आणि 'मृदु व्यंजन'

किंवा 'स्वर' आला तर त्याच्यावर्गांतील तिसरे व्यंजन होते. उदाहरणार्थ १. संमोहात् - स्मृतिविभ्रम: = संमोहात्स्मृतिविभ्रम:; २ क्रोधात् भवति = क्रोधाद्भवति; ३. सम्यक् - उभयो: = सम्यगुभयो:

७. 'झलांजशोन्ते' ८-२-३९ या सूत्रानुसार पदांत व्यंजनापुढे अनुनासिक आले तर व्यंजनाचे वरील नियमाप्रमाणें त्याच्या वर्गांतील तिसरे व्यंजन होते किंवा अनुनासिक होते. उदाहरणार्थ १. षड् - मासा = षड्मासा किंवा षण्मासा; २. अनारम्भात् - नैष्कर्म्यम् = अनारम्भान्नैष्कर्म्यम् / चित्+ मय = चिन्मयम् / मृद्+मय = मृण्मयम्. 'यरोऽनुनासिकेऽनु नासिको वा' ८-४-४५ प्रत्यये भाषायां नित्यम्'

८. 'स्तो: श्चुना श्चु:' ८-४-४ 'ष्टुनाष्टु:' ८-४-४१ या सूत्रानुसार 'त' वर्गांतील व्यंजनांपुढे 'च' वर्गांतील व्यंजन आले तर 'त' वर्गाचा 'च' वर्ग होतो. आणि 'ट' वर्गांतील व्यंजन आले तर 'ट' वर्ग होतो. उदाहरणार्थ १. तत् - च = तच्च; यत् - चंद्रमासि = यच्चंद्रमासि २. यत् - ज्ञात्वा = यज्ज्ञात्वा; यत् - ज्ञानम् = यज्ज्ञानम् ३. स्पृशन् - जिघ्रन् = स्पृशञ्जिघ्रन्

९. पदान्त 'न'च्या पुढे 'च', 'छ' आले तर 'न'च्या स्थानीं अनुस्वार व 'श' येतात. 'ट', 'ठ' आले तर अनुस्वार आणि 'ष' येतात आणि 'त', 'थ' आले तर अनुस्वार आणि 'स' येतात. उदाहरणार्थ १. ऋषीन् - च = ऋषींश्च; २. तान् - तथा = तांस्तथा, ३. प्रज्ञावादान् - च = प्रज्ञावादांश्च, ४. पुमांश्चरति, ५. ऋषींश्च, ६. उरगांश्च, ७. अगतासूंश्च, ८. प्राणांस्त्यक्त्वा, ९. तांस्तितिक्षस्व इ.

१०. 'त' वर्गापुढे 'ल' आला तर 'त' वर्गाचा 'ल' होतो आणि 'न'च्या पुढें 'ल' आला तर मात्र सानुनासिक 'ल' होतो. उदाहरणार्थ १. आब्रह्मभुवनात् - लोका: = आब्रह्मभुवनाल्लोका:; २. इमान् - लोकान् = इमांल्लोकान् ३. श्रद्धावान् - लभते = श्रद्धावाँल्लभते; ४. शुभान् - लोकान् = शुभाँल्लोकान्.

११. अनुनासिकांखेरीज कोणत्याही पदान्त स्पर्श - व्यंजनापुढे 'श' आला तर त्याच्या विकल्पानें 'छ' होतो. उदाहरणार्थ १. तस्मात् - शास्त्रम् = तस्माच्छास्त्रम्, २. यत् - श्रेय: = यच्छ्रेय:, ३. व्यासप्रसादात् - श्रुतवान् = व्यासप्रसादाच्छ्रुतवान्, ४. एतात् - श्रुतम् = एतच्छ्रुतम्

१२. अनुनासिकांखेरीज कोणत्याहि 'स्पर्श - व्यंजनापुढे 'ह' आला तर त्या 'ह'च्या स्थानीं विकल्पानें मागील व्यंजनाच्या वर्गांतील चौथे - चवथे व्यंजन होते. उदाहरणार्थ १. एतत् - हि = एतद्धि, २. धर्म्यात् - हि = धर्म्याद्धि

१३. विसर्गांच्यामागे 'अ' असून पुढे 'अ' किंवा मृदुव्यंजन आले तर 'अ' आणि विसर्ग या दोन्हींचा मिळून 'ओ' होतो. उदाहरणार्थ १. मन्त्र: - अहम् = मन्त्रोऽहम्, २. स्त्रिय: - वैश्या: = स्त्रियोवैश्या:

१४. विसर्गाच्यामागे 'अ' येऊन पुढे 'अ' खेरीजचा कोणताहि 'स्वर' आला तर विसर्गाचा लोप होतो आणि उर्वरित राहिलेल्या स्वरांचा संधि होत नाहीं. उदाहरणार्थ १. अक्षर: - इति = अक्षरइति, २. दु:खयोनय: - एव = दु:खयोनयएव, ३. य: - आस्ते =यआस्ते

१५. विसर्गाच्यामागे 'आ' येऊन पुढे कोणताहि 'स्वर' किंवा 'मृदु' व्यंजन आले तर विसर्गाचा लोप होतो आणि उर्वरित राहिलेल्या स्वरांचा सन्धि होत नाहीं. उदाहरणार्थ १. सात्त्विका: - भावा: = सात्विकाभावा:, २. धार्तराष्ट्रा: - रणे = धार्तराष्ट्रारणे

१६. विसर्गाच्यामागे 'अ, आ' खेरीज कोणताही 'स्वर' येऊन पुढे 'स्वर' किंवा मृदु व्यंजन आले तर विसर्गाचा 'र्' होतो. उदाहरणार्थ १. केवलै: - इंद्रियै: - अपि = केवलैरिन्द्रियैरपि, २. त्रिभि: - गुणमयै: - भावै: = त्रिभिर्गुणमयैर्भावै:

१७. विसर्गाच्यापुढे 'च्, छ्' आले तर विसर्गाचा 'श' होतो, 'ट्, ठ्' आले तर 'ष्' होतो आणि 'त्, थ्' आले तर 'स्' होतो. उदाहरणार्थ १. अकर्म: - च = अकर्मणश्च, २. द्रौपदेया: - च = द्रौपदेयाश्च, ३. कामै: - तै: - तै: = कामैस्तैस्तै:

१८. 'स:' आणि 'एष:' यांच्यापुढे 'अ' खेरीज कोणताही 'वर्ण' आला तर त्यांच्या विसर्गाचा लोप होतो. उदाहरणार्थ १. स: - याति = सयाति २. काम: एष: क्रोध: एष: रजोगुणसमुद्भव: = काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भव: